# प्रेसनोट

ला.प्र. विभाग, नाशिक
दिनांक २९.०९.२०२६

**गांधी पुतळा धुळे येथे ग्राम महसुल अधिकारी मोहित वारे सजा कुसुंबा अतिरिक्त कार्यभार कौठाळ ता.जि.धुळे तसेच खाजगी इसम नामे प्रदीप पाटील रा. कौठाळ ता.जि.धुळे यांनी तक्रारदार यांच्याकडे २०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन मोहीत वारे यांनी सदर लाचेची रक्कम स्विकारुन खाजगी स्वप्निल देसले यांचे ताब्यात दिल्याने देसले यांनी लाच स्विकारल्याने गुन्हा**

| अ.क्र. | शिर्षक | तपशिल |
|---|---|---|
| १ | घटक | नाशिक |
| २ | तक्रारदार | पुरुष, वय ३९ वर्षे, |
| ३ | आरोपी | १. मोहीत बाबासाहेब वारे, ग्राम महसुल अधिकारी, सजा कुसुंबा अतिरिक्त कार्यभार कौठाळ ता.जि. धुळे<br>२. प्रदीप विश्वास पाटील, खाजगी इसम, रा. कौठाळ ता.जि.धुळे<br>३. स्वप्निल रामकृष्ण देसले (खाजगी इसम) रा. वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे |
| ४ | तक्रार | तक्रारदार यांचा बांधकाम मटेरीयल वाहतुकीचा व्यवसाय असुन त्यांचे मालकीचे दहा टायर एम.एच. १६ ए.वाय १८०९ अशो लेलन व बारा टायर एम.एच १५ एफ.व्ही. १८९९ महिंद्रा कंपनीचे या दोन वाहनांमधुन दिड महिन्यापुर्वी पांझरा नदी मधुन रेतीची वाहतुक करुन अमळनेर, जि. जळगांव येथे घेवुन जात असतांना खाजगी इसम नामे प्रदीप पाटील हे तक्रारदारास भेटले व मी तलाठी मोहीत वारे यांचे काम पाहतो तुम्हाला आमचे गावातुन रेती भरायची असेल तर मी तलाठी यांचेशी बोलुन तुमच्या गाडया रेती भरुन आमचे गावातुन पास करुन देईल त्यासाठी तुम्हाला तलाठी मोहीत आप्पा यांना भेटुन घ्यावं लागेल नाहीतर ते रेती वाहतुक करतांना तुमची गाडी अडवुन तुमच्यावर कारवाई करतील.असे सांगितले.<br>त्यानंतर दि.२५.०९.२०२६ रोजी रात्री मोहाडी फाटा कौठळ, ता.जि.धुळे येथे तक्रारदार उभे असतांना खाजगी इसम प्रदीप पाटील हा त्यांना भेटला व बोलला की, तलाठी मोहीत आप्पा यांचा तुमच्यासाठी निरोप आहे की त्यांना पांझरा नदी कौठळ येथुन रेती वाहतुक करायची असेल तर प्रत्येक गाडी मागे २५,०००/—रु दयावे लागतील तसेच यापुर्वी दोन गाडया रेती भरुन नेली त्यावेळेस तुम्ही मोहीत आप्पा यांना भेटले नाही त्यामुळे ते तुमच्या वाहनावर अवैध गौण वाहतुकीचा गुन्हा दाखल करणार आहे तरी तुम्ही मोहीत आप्पा यांना भेटुन त्यांची काय मागणी आहे त्याप्रमाणे त्यांना पैसे देवुन टाका असे सांगुन दि.२८.०९.२०२६ रोजी गांधी पुतळा धुळे येथे तलाठी मोहीत आप्पा यांचे भेटीकरीता पैसे घेवुन बोलविले आहे. त्याबाबत तक्रारदार यांनी दि.२८.०९.२०२६ रोजी ला.प्र.वि, नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती. |
| ५ | तक्रारीची पडताळणी | दि.२८.०९.२०२६ रोजी सदर तक्रारीची पडताळणी केली असता तलाठी मोहीत वारे यांनी तक्रारदार यांचेकडे २५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २०,०००/—रु लाच स्विकारण्याचे मान्य केले तसेच खाजगी इसम प्रदीप विश्वास पाटील यांनी आलोसे वारे यांचे करीता २०,०००/—रु ची लाचेची मागणी करुन ती देण्यास तक्रारदार यांना प्रोत्साहन दिले |
| ६ | सापळा कार्यवाही | दि.२८.०९.२०२६ रोजी सापळा कारवाई आयोजित केली असता सदर कारवाई दरम्यान खाजगी .व स्वप्निल रामकृष्ण देसले यांचे समक्ष तलाठी मोहीत वारे यांनी तक्रारदार यांचेकडुन २०,०००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारुन लागलीच स्वप्निल देसले यांचे कडे दिल्याने देसले यांनी सदर लाच रक्कम स्विकारुन स्वत: च्या ताब्यात ठेवली असतांना तिघांना रंगेहात पकडण्यात आले आहे. |
| ७ | गु.र.नं.,कलम/पो.स्टे./ जिल्हा, दिनांक व वेळ | आझादनगर पो.स्टे., जि. धुळे येथे भ्र.प्र.का. कलम ७ व ७–अ, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| ८ | आरोपी अटक दिनांक व वेळ | आलोसे क्र.१ व आरोपी क्र. ०२ व ०३ यांना ताब्यात घेण्यात आले आहे. |
| ९ | सापळा अधिकारी | सुवर्णा हांडोरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. नाशिक मो नं.९०११०१०४४६ |
| १० | पर्यवेक्षक अधिकारी | स्वप्निल राजपुत, वाचक पोलिस निरीक्षक, ला.प्र.विभाग, नाशिक |
| | तपास अधिकारी | पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. धुळे |
| ११ | सापळा पथक | सुवर्णा हांडोरे पोलीस निरीक्षक, पोहवा. संदीप हांडगे, पोलीस अंमलदार सुरेश चव्हाण |
| १२ | मार्गदर्शन | श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, मो. नं.८८८८३२१४६<br>श्री. प्रदिप मैराळे, अपर पोलीस अधीक्षक मो.नं.९६७३९८८०००<br>श्रीमती कविता फडतरे, अपर पोलीस अधीक्षक, मो.नं.८१४९८३४४६५<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमुद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.**

**पत्ता—** ला.प्र.विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक, तिबेटियन मार्केट, मनपा, भाजीपाला मार्केटचे वर, शरणपुर रोड, नाशिक

संकेत स्थळ — acbmaharashtra.gov.in
इमेल — spacbnasik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार — acbmaharashtra.net
टोल फ्रि क्रमांक — १०६४
दुरध्वनी क्रमांक — ०२५३—२५७५६२८
लाप्रवि. नाशिक व्हॉटसप क्रमांक — ९९३०९९७७००, ९५४५०३१०६४

**सुवर्णा हांडोरे**
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक